# महाराष्ट्र शासन

## आरोग्य विभाग

जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>वयक्तिक<br>Email | ०२५१-२७०९४३२<br>०२५१-२७०८७३०<br>ulhasnagarcs@gmail.com | जा.क्र.मरुउ/भांडार/किरकोळ साहित्य सामुग्री खरेदी दरपत्रके मागविणे//२६<br>दिनांक 17 / 3/२०२६ 4614-15 |


## जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सन-२०२६-२०२७ या कालावधीमध्ये या रुग्णालयातील विविध विभाग,वॉर्ड व कार्यालयासाठी आवश्यक असलेली सोबत जोडलेल्या यादीनुसार साहित्य सामुग्री (पेटी सप्लाय ) साहित्याची खरेदी करणेकामी दर निश्चितीसाठी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केलले आहे. तरी इच्छुक किरकोळ (पेटी सप्लाय ) साहित्य व्यापारी यांनी बंद लिफाफामध्ये खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत (खालील अ.क्र.१६ नुसार) जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी. स्थानीक पुरवठाधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

==========================================================

### दरपत्रके सादर करणा-यां रिफिलिंगधारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक साहित्य सामुग्री (पेटी सप्लाय) पुरवठा धारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) एका साहित्य सामुग्री (पेटी सप्लाय) पुरवठा धारक यांना बाबनिहाय फक्त ०१ दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.उदा.जर दोन साहित्य (पेटी सप्लाय ) पुरवठा धारक कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी. साहित्य (पेटी सप्लाय ) पुरवठा करण्यासाठी अधिकृत साहित्य (पेटी सप्लाय ) पुरवठाधारक, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील.

३) दरपत्रकात पुरवठा करण्यात येणा-या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे ग्रॅम,किलो ग्रॅम,कंपनी,व इतर बाब नमुद करणे आवश्यक आहे.पुरवठादार,निर्माणकर्ते (Manufaturer)यांचे अधिकृत विक्रेता/ठोक व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

५) संस्था/दुकान,साहित्य पुरवठा/विक्रि विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडवा.

६) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण- जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

७) व्यापारी लिफाप्यामध्ये यादीमधील साहित्याचे वजन,कंपनी यानुसार प्रती नग दर GST व इतर करांसह नमुद करावेत.

८) विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

९) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे GST व इतर सर्व करांसह व उचल-ठेव हमाली पोहच खर्चासहीत असावे.सर्व साहित्य स्वतंत्ररित्या बांधुन मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे पोहच करावी लागेल.तसेच पोहोच करतेवेळी त्याची गणना यादीनुसार करुन देणे बंधनकारक राहिल.

१०)मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दरधारकाकडुन वसुल केली जाईल.

११)सर्व वस्तुंचे दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावेत.

१२)वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३)मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयास पुरवठा करण्यात येणा-या वस्तुंचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. सदरील वस्तु आय.एस.आय मार्क दर्जाच्या किंवा त्यासमान दर्जाच्या असाव्यात.

१४)स्टेशनरी साहित्य पुरवठा धारकास कोणत्याही शासकीय विभागाने पुरवठा प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१५)दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकपासून सात दिवस दिनांक 30/३/२०२६ संध्या.५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१६)दरपत्रके उघडण्याची तारीख 01/4/२०२६ संध्या ०५.३० वा. किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१७)कोणतेही लेखी किंवा तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा अंशतःखरेदी प्रक्रिया रद्द् करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ यांनी राखून ठेवलेले आहेत.

१८)या रुग्णालयाकडुन मागणी केलेल्या वस्तुंचेच व्यापारी लिफाफात दर GST करांसह नमुद करावे.

१९)मान्य न्युनतम दर आदेश निर्गमित केल्यापासुन एक वर्ष (३६५ दिवस) कालावधीसाठी वैध राहतील.

17-03-26

(डॉ.मनोहर बनसोडे)
जिल्हा शल्यचिकीत्सक
मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

प्रत- या रुग्णालयाच्या नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्दीसाठी .

NHM IT cell या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

# व्यापारी लिफाफा

## रुग्णालयीन,कार्यालयीन साहित्य निहाय यादी

| अ. क्र | साहित्याचे नाव | खरेदीसाठी प्रस्तावित असलेले साहित्य | साहित्य प्रति ०१ किलो/नग/जोडी पाकीट GST करांसह दर |
|---|---|---|---|
| १ | Life Boy Soap १२५ gm | २०० नग | |
| २ | Bleaching Powder ( १ kg ) | १५० किलो | |
| ३ | Wheel Washing Powder ( १ kg ) | २०० किलो | |
| ४ | Odopic Powder ( १ kg ) | १०० किलो | |
| ६ | Pencil Cell | ५०० नग | |
| ७ | Pencil Cell Micro | ५०० नग | |
| ८ | Glucometer Cell | ५०० नग | |
| ९ | Kharata Big | २०० नग | |
| १० | Dry Mop | १०० नग | |
| ११ | Full Zadu Big | २०० नग | |
| १२ | wiper | १०० नग | |
| १३ | Sliper Chappel No ८ | ५० जोडी | |
| १४ | Sliper Chappel No ९ | ५० जोडी | |
| १५ | Washing Soap wheel १०० gm | ३०० नग | |
| १६ | Dustbin | ५० नग | |
| १७ | Lock (Medium Size) | ५० नग | |
| १८ | Wet mop ( पोचा ) | १०० नग | |
| १९ | Steel katha | ३०० नग | |
| २१ | Toilet Brush | ५० नग | |
| २२ | Cello Tape ( ३ inch Thikness) | ५० नग | |

स्वाक्षरी

स्टेशनरी साहित्य पुरवठा धारकाचे संपुर्ण नाव---------------------------

स्टेशनरी साहित्य पुरवठा करणा-या संस्थेचे नाव--------------------------

संपुर्ण पत्ता -----------------------------------------------------